नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 26/03/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर सरस्वती नगर, काटोल येथे दिनांक 25/03/2021 चे 08.00 वा. ते दिनांक 26/03/2021 चे 10.30 वा. फिर्यादी नामे– श्री हेमंत बाबुराव भजन, वय 41 वर्ष, रा खामली पो. स्टे. सोनोली ता. काटोल ह. मु. तुकाराम चाफले रा. साठवणे लेआउट, सरस्वती नगर, काटोल हे आपले परिवारासह आपले मुळगावी गेले होते. फिर्यादीचे किरायाचे राहते घराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन .घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील कडप्याचे रॅकमध्ये एका बॅग मध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि 94,790/– रू. व नगदी कि. 40,000/–रू. असा एकुण कि. 1,34,790/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आकाश शाही 9881281281071 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 15 किमी अंतरावर नवरगाव येथे दिनांक 25/03/2021 चे 05.30 वा.दरम्यान एमच–36/एफ–3481क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी क्र– 1) सिद्धार्थ अशोक लोणारे, वय 29 वर्ष, रा. पल्लाडी, जि. भंडारा व 2) ट्रकचा मालक आरोपी यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 25,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 2,25,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार ज्ञानेश्वर राउत यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि चाबबुकस्वार 9867806415 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 03 मी अंतरावर दुधाळा कवडक रामटेक येथे दिनांक 25/03/2021 चे 11.00 वा. ते दिनांक 25/03/2021 चे 01.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरिशचंद्र शामराव मेहरकुळे, वय 56 वर्षे रा, दुधाळा कवडक हा ठेक्याने करीत असलेल्या शेतातील सौर उर्जेचा सोलर 15 प्लेटा कि, 1,50,000/– रू. च्या अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना दिपक यादव मो. 9637772404 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर